GREAVES
SINCE 1859

impact
www.impactmeasurement.co.in

पुण्य नगरी SMART मुंबई

Mumbai - Dec 26, 2023

Page No: 3
Page Name: n.a.
Size: 228 sq. cm
AVE: INR 125,425

Type: Supplement
Language: Marathi
Circulation: 14,449
Frequency: Random

News monitored for: Greaves Cotton
Title: How much time will it take for EV's to be popular in India?

# विद्युतवाहनांच्या पूर्ण अवलंबासाठी किती काळ लागेल?





भारतात ईव्हीचा पूर्ण अवलंब होण्यास ५-७ वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधी लागू शकतो, असे ग्रीव्हज इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या थ्री व्हीलर व्यवसायाचे सीईओ निर्मल एनआर यांनी म्हटले आहे.

सध्याच्या सरकारी सरकारी धोरणांनी इलेक्ट्रिक थ्री-व्हीलरच्या वापराला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याची गती स्थिर असली तरी जलद वाढीची अमर्याद क्षमता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. निर्मल एनआर यांनी या वर्षाच्या सुरूवातीला झालेल्या ऑटो एक्स्पोमध्ये दाखविलेल्या तीनचाकी उत्पादनाबद्दल आणि कंपनीच्या उत्पादन सुविधेबद्दल यावेळी सविस्तर सांगितले आहे.

ऑटो एक्स्पोमध्ये, आम्ही तीन तीनचाकी वाहने, इएलसी (इलेक्ट्रिक कार्गो), इएलपी (इलेक्ट्रिक पॅसेंजर्स) आणि आमचे स्वतःचे डिझाइन केलेले कन्सेप्ट वाहन प्रदर्शित केले होते. कन्सेप्ट व्हेईकल उपलब्ध होण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. अल्ट्रा कार्गोची पुढील आवृत्ती पुढील आर्थिक वर्षात येईल. याशिवाय अट्राचे पॅसेंजर व्हेईकलही पुढील महिन्यात येणार आहे.

आमची उत्पादन सुविधा हैदराबाद येथे आहे आणि ती २५ एकरांमध्ये पसरलेली आहे. यापूर्वी हा एमएलआर ऑटोचा भाग होता, जो आमच्या अधिग्रहणानंर ग्रीव्हज इलेक्ट्रिक मोबिलिटीचा भाग बनला आहे.

इलेक्ट्रिक वाहन विभागातील तीन-चाकी वाहनांची एकत्रित विक्री दरमहा सुमारे १ लाख युनिट्स आहे, ज्यामध्ये एल ३ आणि एल ५ या दोन्ही श्रेणींचा समावेश आहे. यापैकी सुमारे ५०,००० इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर आहेत, ज्या बाजारपेठेत मजबूतता दर्शवत आहेत. व्यावसायिक हेतू लक्षात घेऊन इलेक्ट्रिक थ्री-व्हीलरचा वेगाने अवलंब केला जात आहे. दुसरीकडे, अवजड वाहन वापरकर्त्यांसाठी इलेक्ट्रिक वाहनांचे फायदे अधिक स्पष्ट आहेत.

आम्ही एल ३ आणि एल ५ या दोन्ही श्रेणींमध्ये वाहने बनवतो, विशेष चार्जिंग पायाभूत सुविधांची गरज नाही. घरांमध्ये आढळणारे नियमित १६ ॲंपिअर (१५ किंवा १६) प्लग वाहने चार्ज करण्यासाठी पुरेशी असतात. प्रत्येक वाहन त्याच्या स्वतःच्या चार्जरसह आहेत. १६-एएमपी प्लगसह कोणत्याही ठिकाणी चार्जिंगला परवानगी देते. वाहनाची रेंज वाढवण्यासाठी आम्ही बॅटरीचा आकारही वाढवला आहे, जेणेकरून वापरकर्त्याला ती पुन्हा पुन्हा चार्ज करण्याची गरज भासणार नाही.

ग्रीव्हज कॉटन लिमिटेड १६४ वर्षांची कंपनी आहे. आमच्या ऑपरेशन्सच्या केंद्रास्थानी संशोधन आणि विकासावर भर आहे, जो आमच्या अभियांत्रिकी प्रयत्नांचा पाया आहे. बेंगळुरूमध्ये असलेल्या आमच्या संशोधन आणि विकास केंद्रात सुमारे ४०० अभियंत्यांची एक टीम आहे जी वाहन विकासाच्या विविध पैलूंवर सतत काम करत असतात. अभियंत्यांव्यतिरिक्त, विक्रीनंतरची सेवा आणि इतर अनेक बाबींमध्ये गुंतलेल्या व्यक्तींचा समावेश आहे.



© Punya Nagri - Smart Mumbai